दैनिक महाराष्ट्र **सूर्योदय**

www.esuryodaylive.com

Email : suryodaykokan.123@gmail.com

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)

24 तास सेवा

॥ श्री नागनाथ कृपा ॥

प्रो.प्रा.यमपुरे अशोक

8014842121

सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स

CHEMIST & DRUGIST

शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल

सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील

मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

पुणे || वर्ष २ रे || अंक २११ || सोमवार, १५ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# इंद्रायणी नदीवरील पुलाचे कठडे धोकादायक पुलाचे दुतर्फा कचऱ्याचे साम्राज्य ; संरक्षक जाळ्या बसविण्याची मागणी

पुणे विशेष प्रतिनिधी

( सुहास सावंत ) : पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील चऱ्होली बुद्रुक आणि चऱ्होली खुर्द यांना जोडणारा रस्ता तीर्थक्षेत्र आळंदी विकास आराखड्यातून विकसित करण्यात आला. मात्र रस्त्याचे रुंदी प्रमाणे रुंदीकरण न झाल्याने रस्त्यावरून रोबवून उचलण्याची मागणी जोर धरत आहे. पुलाचे दोन्ही बाजूला संरक्षक जाळी बसविण्याची आवश्यकता असून नुकत्याच बस ला झालेल्या अपघातात ७० मुलांचे प्राण प्रसंगावधान राखत घेतलेल्या दक्षते मुळे वाचले आहे. अद्याप दुर्घटने नंतर अद्याप ही त्या ठिकाणचे लोखंडी कठडे दुरुस्त



बाह्यवळण मार्गावरून रहदारी करणे धोक्याचे झाले आहे.

या रस्त्यावरील इंद्रायणी नदीवरील पुलावर शालेय मुलांची वाहतूक करणारी शालेय बसला अपघात झाला.यात सुमारे ७० मुले वाचली. या बाह्यवळण मार्गाचे दुतर्फा मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्या ने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. वाहन चालक, नागरिक यांना रहादारित नक मुठीत धरून पादचाऱ्यांना चालावे लागते. या मुळे नागरिकांत नाराजी आहे. तीर्थक्षेत्र आळंदी विकास आराखड्या अंतर्गत करण्यात आलेल्या बाह्यवळण मार्ग पुला जवळ धोकादायक वळण असून सदरचे वळण कमी करण्यासाठी रस्त्याचे रुंदी प्रमाणे पूला जवळ रस्ता विकसित करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे. सदर ठिकाणचा कचरा तात्काळ स्वच्छता मोहीम करण्यात आले नसल्याने वाहन चालक नागरिक धोकादायक स्थितीत ये जा करीत आहे. या बाह्यवळण मार्गावर खड्यांचे साम्राज्य देखील असून खड्ड्यांमुळे वाहन चालविणे गैरसोयीचे होत आहे. पुलावर माती साचल्याने पावसाचे पाणी साचून रहात आहे. यामुळे ये जा करणारे पादचारी यांचे अंगावर पाणी उडून त्रासदायक झाले आहे. या प्रकरणी तात्काळ पुलाची रस्त्याची दुरवस्था दूर करण्याची मागणी नागरिकांचे वतीने तुकाराम महाराज ताजणे यांनी केली आहे. या संदर्भात चऱ्होली खुर्द ग्रामपंचायतचे ग्रामविस्तर अधिकारी भाऊसाहेब जगदाळे म्हणाले, पंचायत तर्फे संरक्षक जाळी सह स्वच्छतेचे काम केले जाईल. स्वच्छ भारत उपक्रम अंतर्गत वृक्षारोपण करून रस्त्याचे दुतर्फा स्वच्छता राहील याची ग्वाही त्यांनी दिली.

# आषाढी यात्रेसाठी पंढरपूर रेल्वे स्टेशन सज्ज

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने आषाढी यात्रेसाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. निरज कुमार दोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर रेल्वे स्टेशनचे सुसज्ज नियोजन केले आहे. यात्रेसाठी येणाऱ्या सर्व भाविकांना कुठल्याही प्रकारे त्रास होऊ नये यासाठी रेल्वेने युद्ध पातळीवर व्यवस्था केलेली आहे. रेल्वेतील प्रत्येक विभागाने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या.

सर्व वारकरी भाविकांना पंढरपूर मध्ये येण्यासाठी महाराष्टातून आणि इतर राज्या मधून विशेष रेल्वे गाड्यांची व्यवस्था दिनांक १२ जुलै २०२४ पासून ते २१ जुलै २०२४ पर्यंत करण्यात आलेली आहेत.

सोलापूर रेल्वे विभागाने केलेले नियोजन

नियमित तिकीट खिडक्या वगळता अतिरिक्त दहा तिकीट खिडक्या ची व्यवस्था



रेल्वे स्थानकात'मदत सहाय्यता केंद्र ची व्यवस्था.

अतिरिक्त शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था(अतिरिक्त पाण्याचे टॅप) पाणी टँकर २००० लिटर क्षमतेसह व्यवस्था

अतिरिक्त मोबाइल शौचालय.

अतिरिक्त २४ तास सफाई कर्मचाऱ्यांच्या व्यवस्था.

कोच सफाई ची व्यवस्था

वॉटर प्रूप सुरक्षित टेंट्सची व्यवस्था रेल्वे स्थानक परिसरात सीसीटीव्ही.

स्थानिक नियंत्रण कक्ष स्टेशन व्यवस्थापक कार्यालयात असणार.

नियमित सूचना, २४ तास अनाउंसमेंट ची व्यवस्था.

पाणी आणि शौचालयांसाठी मराठी आणि हिंदीतुन साइन बोर्ड.

अतिरिक्त फॅन आणि मोठ्या प्रकाराचे लाईट ची व्यवस्था.

प्लेटफॉर्म आणि फूट ओव्हर ब्रिज व्यवस्थापनासाठी आरपीएफ आणि वाणिज्य कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती.

पर्याप्त अग्निशामक ची व्यवस्था

स्थानिक नियंत्रण कक्ष आणि अंबुलन्स ची व्यवस्था.

स्थानिक रुग्णालयाबरोबर टायप करून व्यवस्था, स्टेशनवर डॉक्टर्स आणि बूथ्स नियुक्त, अतिरिक्त सीएचआय (हेल्थ निरीक्षक) आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती.

त्वरित कचरा निर्मूलनाची व्यवस्था. प्रत्येक दिवशी विशेष मुख्य अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली नियोजन केला जाईल.

तरी आषाढी वारीला आलेल्या सर्व भाविकांनी शांततेच्या आणि सुरक्षेच्या पालन करून, कमीत कमी सामानासह रेल्वे प्रवास करावा आणि आपल्या मौल्यवान वस्तूची काळजी घेऊन वारी करावी असे आवाहन रेल्वे प्रशासना कडून करण्यात आले आहे.

# कृष्णा पुसनाके यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा..

शालेय साहित्य, वृक्षारोपण,करियर विषयक मार्गदर्शन,सर्प विषयक जनजागृती करत वाढदिवस साजरा....

मनोज राऊत /यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी,ङ्गदिनांक - १४ जून,२०२४.ङ्गङ्गसंभाजी ब्रिगेड विद्यार्थी आघाडी,कृषी ज्ञानदा बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था,बिरसा ब्रिगेड,व एम.एच.२९ हेल्पिंग हॅन्ड वन्यजीव संघटना यवतमाळ च्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सावरगड,ता.जिल्हा यवतमाळ येथे दिनांक १३ जुलै रोजी सोशल मीडिया काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष,कृष्णा पुसनाके यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण भागातील



गरजु,अल्पभूधारक,शेतमजूर कुटुंबातील एकूण ५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री.विकास झाडे सर यांना वृक्ष लागवडीसाठी एकूण ५० झाडे सुपूर्द करण्यात आली.नंतर जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या विद्यालय,यवतमाळ येथे ईयत्ता ८ वी ते १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींना शालेय साहित्य वाटप करून १२ वी नंतर असलेल्या करियरच्या संधी या विषयावर प्रा.पंढरी पाठे यांनी कन्या विद्यालयाचे प्राचार्य श्री.तांड्रावार सरांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये मार्गदर्शन केले.तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना प्रज्वल तुरकाने व मोंटू तेलगोटे यांनी विदर्भातील विषारी सापांबद्दल माहिती दिली.आज १४ जुलै रोजी यवतमाळ शहरातील स्थानिक गोधनी रोड परिसरातील(स्नेक पॉईट)या प्रक्षेत्रामध्ये औषधी वनस्पतींची लागवड करून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले.सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रज्वल तुरकाने,मोंटू तेलगोटे,विकास राठोड,सचिन मनवर,निलेश मेश्राम,प्रकाश कांबळे,जीत पाटील,यांनी परिश्रम घेतले.

# १३५६ उमेदवारांनी दिली पोलिस शिपाई पदाची लेखी परीक्षा; उत्तरसूची प्रसिद्ध

पुणे: जिल्हा पोलिस दलात रिक्त असलेल्या १२५ पोलिस शिपाई पदभरतीच्या अनुषंगाने मैदानी चाचणीत लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी १ हजार ३५६ जणांनी परीक्षा दिली.

जिल्हा पोलिस दलात रिक्त असलेल्या पोलिस शिपाई पदांच्या भरतीची प्रक्रिया गत काही महिन्यांपासून सुरू आहे. १९ जून ते १ जुलै या दरम्यान मैदानी चाचणी घेण्यात आली. अर्ज केलेल्या ८ हजार ५३१ उमेदवारांपैकी ५ हजार ९६० उमेदवार प्रत्यक्ष शारीरिक व मैदानी चाचणीस हजर राहिले. त्यामध्ये ५० टक्के गुण घेऊन ३ हजार ३४२ उमेदवार उत्तीर्ण झाले. रिक्त पदाच्या

१:१० या प्रमाणात एकूण १ हजार ३६६ उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले होते. या उमेदवारांची शनिवार, १३ जुलै रोजी सहकार विद्यामंदिरात लेखी परीक्षा पार पडली. जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने यांच्या मार्गदर्शनात ही परीक्षा शांततेत पार पडली.



***उत्तरसूची जाहीर, आजच घ्यावा लागणार आक्षेप***

*बुलढाणा जिल्हा पोलिस दलाकडून सन २०२२-२३ अंतर्गत शिपाई पदासाठी शनिवारी लेखी परीक्षा घेण्यात आली.*

*या परीक्षेची उत्तरसूची बुलढाणा जिल्हा पोलिस दल संकेतस्थळ, पोलिस मुख्यालय, नियंत्रण कक्ष येथे प्रसिद्ध करण्यात आली आहे.*

*सूचीतील प्रश्नांच्या उत्तराबदल काही आक्षेप असेल तर त्याबाबत योग्य स्पष्टीकरण, पुराव्यासह १४ जुलैच्या सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोलिस नियंत्रणा कक्ष, पोलिस अधीक्षक कार्यालय येथे समक्ष आक्षेप लेखी स्वरुपात अथवा कार्यालयाच्या ई-मेलवर लेखी स्वरुपात कळवता येईल.*

*मुदत कालावधी संपल्यानंतर प्राप्त झालेल्या आक्षेपाची नोंद घेतली जाणार नसल्याचे जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने यांनी स्पष्ट केले.*

***१० उमेदवार गैरहजर***

*शिपाई पदासाठी १३ जुलैला घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेला १० उमेदवार गैरहजर राहिल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाकडून देण्यात आली.*

***परीक्षा सुरळीत***

*शिपाई पदासाठी शनिवारी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेदरम्यान उमेदवारांनी बायोमेट्रिक हजेरी घेण्यात आली. परीक्षेसाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.*

# पूजा खेडकरचे वडील कोट्यधीश; वंचितकडून लोकसभाही लढवली

पुणे: पूजा खेडकर यांचा पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील श्रीमंती थाट आणि रुबाब चर्चेचा विषय ठरला होता. मुलीप्रमाणेच दिलीप खेडकर यांची प्रशासकीय कारकीर्द वादग्रस्त राहिली आहे.

२०२३ बॅचच्या परिविक्षाधीन आयएएस अधिकारी पूजा खेडकर या सध्या चर्चेत आहेत. त्यांची नुकतीच पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातून वाशिममध्ये बदली करण्यात आली आहे.खासगी वाहनांवर लाल दिवा लावणे, सरकारी चिन्हांचा वापर करणे, आयएएस अधिकाऱ्यासारख्या सुविधा मागणे, वेगळी कॅबिन, स्वतंत्र सरकारी बंगला अशा काही मागण्या त्यांनी केल्या होत्या. आता पूजा खेडकर यांच्या संदर्भात एक महत्त्वाची अपडेट समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पूजा खेडकर यांच्या वडिलांनी वंचित बहुजन आघाडीच्या तिकीटावर अहमदनगर लोकसभा निवडणूक लढवली होती. पुण्यातील माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी खेडकर यांच्या नियुक्तीवर आक्षेप घेतला आहे. त्यांनी सांगितलं की,

पूजा यांचे वडील दिलीप खेडकर यांनी लोकसभा लढवली होती. त्यांची एकूण संपत्ती ४० कोटी इतकी आहे. त्यांचे वार्षिक उत्पन्न ४९ लाख आहे.

पूजा खेडकर यांनी अपंग व्यक्तीच्या कोट्यातून नियुक्ती मिळवली आहे.

तसेच, त्यांनी ओबीसी नॉन क्रिमीलीयर सर्टिफिकेटचा फायदा घेतल्याचं सांगण्यात येत आहे. पूजा खेडकर यांचे वडील हे प्रदूषण नियंत्रण मंडळातील निवृत्त सरकारी अधिकारी होते.

नॉन क्रिमीलीयरची मर्यादा ८ लाखांची आहे. वडिलांचे वार्षिक उत्पन्न ४९ लाख असताना नॉन क्रिमीलीयर सर्टिफिकेटचा फायदा घेतल्याचा पूजा खेडकर यांच्यावर आरोप आहे. दिलीप खेडकर हे अधिकारी असताना त्यांच्यावर देखील भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते. त्यांचे निलंबनही झाले होते. त्यांचे मुळ गाव पाथर्डीमधील भालगाव आहे.

अभियांत्रिकीचे त्यांनी शिक्षण घेतले आहे. त्यांना दोन मुलं आहेत. पूजा खेडकर या परिविक्षाधीन आयएएस अधिकारी आहेत, तर पियुष हा लंडनमध्ये शिक्षण घेत असल्याची माहिती आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये दिलीप खेडकर यांना १३ हजार ७४९ मते मिळाली होती.

दिलीप खेडकर यांचे भाऊ माणिक खेडकर हे पाच वर्षे भाजपचे तालुकाध्यक्ष होते. माहितीनुसार,

त्यांनी पंकजा मुंडे यांना भाजपकडून लोकसभेचे तिकीट मिळावे यासाठी मोहटादेवीला साकडे घातले होते. दीड किलो वजनाचा चांदीचा मुकूट अर्पण करणार असल्याचं ते म्हणाले होते.पंकजा मुंडे यांना उमेदवारी मिळाल्यावर त्यांनी आपले साकडे पूर्ण केले होते. सुजय विखेंसोबत वाद झाल्यानेच त्यांनी वंचितकडून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता.

संपादकीय

# घडामोडी घडल्या.

मोबाइल, ऑटो तसेच टेलिकॉम क्षेत्रामध्ये गेल्या काही दिवसांमध्ये तंत्रविश्वात अनेक लक्षवेधी घडामोडी घडल्या. या घटनांमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसणार आहे, हे दिसून आले. दुसरीकडे ऑटो जगतातल्या काही महत्त्वपूर्ण बाबींनीही जनसामान्यांचे तसेच ठरावीक वाहनांच्या चाहत्यांचे लक्ष वेधले. बाजारातील विक्रीला तसेच ग्राहकवर्गाच्या पसंतीला नवे आयाम देऊ शकणाऱ्या अशाच काही घडामोडींचा हा खास मागोवा.

गेल्या काही दिवसांमध्ये टेक जगतात लक्षवेधी घडामोडी घडल्या. या घटनांमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसणार आहे, हे दिसून आले. सार्वत्रिक निवडणुका संपताच दूरसंचार कंपन्यांनी मोबाइलच्या दरात वाढ करण्याची घोषणा केली. जिओ, एअरटेल आणि व्ही या कंपन्याचे रिचार्ज प्लॅन्स १५ ते २० टक्क्यांपर्यंत महाग करण्यात आले. यामुळे ग्राहकांच्या मोबाइलचे बील आता चांगलेच वाढणार आहे. असे असले तरी या दरवाढीमुळे दूरसंचार कंपन्यांना व्यवसाय विस्तारासाठी आणि सेवेचा दर्जा वाढवण्यासाठी अत्यावश्यक असा निधी उभा करता येणार आहे. जिओच्या बाबतीत बोलायचे तर ही कंपनी रिलायन्सच्या छत्रछायेतून बाहेर काढून एक स्वतंत्र ओळख असलेली मोठी कंपनी म्हणूनही मान्यता मिळवू शकते. त्यामुळे सामान्यांना दरवाढीच्या चरकात अडकवले तरी उद्या उत्तम, वैविध्यपूर्ण सेवा देण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. शिवाय या दरांमध्ये गेली तीन वर्षे कोणतीही वाढ करण्यात आली नव्हती, हेही लक्षात घ्यायला हवे.

जिओ फोनधारकांसाठी दुसरी दखलपात्र बाब म्हणजे 'जिओ सेफ' आणि 'जिओ ट्रान्सलेट' ही दोन ॲप्सही लाँच करण्यात आली आहेत. 'जिओ सेफ'मध्ये व्हीडिओ कॉलर, व्हॉईस कॉलर, मेसेजेस, फाईल ट्रान्सफर असे व्हॉट्सॲपसारखे काही फीचर्स देण्यात आले आहेत. पण महत्त्वाची बाब अशी की, त्यासाठी तुम्हाला दरमहा २०० रुपये मोजावे लागणार आहेत. तर दरमहा ९९ रुपये भरून 'जिओ ट्रान्सलेट' हे ॲप तुम्ही वापरू शकता. हे ॲप एआयचा उपयोग करून व्हॉईस कॉल्स, मेसेजेस भाषांतरीत करते. दरम्यान, एक वर्षासाठी ही दोन्ही ॲप्स ग्राहकांना मोफत मिळणार असल्याची घोषणा 'जिओ'ने केली आहे. दरम्यान, 'बीएसएनएल' कर्नाटकमध्ये फोर-जी नेटवर्क लाँच करणार आहे. कर्नाटकमधील म्हैसूर, मंड्या, चमराजनगर आणि कोडागू येथे हे नेटवर्क लाँच होणार आहे. हे नेटवर्क पुढे जाऊन फाईव्ह-जीमध्ये बदलण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. सेवा नीट देता यावी यासाठी या भागात ६९० टॉवर्स बांधण्यात येणार असल्याचेही जाहीर करण्यात आले आहे. या भागांमधल्या ७९ जागांवर नेटवर्कच नाही. त्यामुळे इथे नेटवर्क देणारी 'बीएसएनएल' ही पहिलीच कंपनी ठरली.

भारतामध्ये अलीकडेच नवा टेलिकम्युनिकेशन ॲक्ट लागू करण्यात आला. या ॲक्टचे काही विभाग लागू करण्यात आले आहेत. या ॲक्टच्या मुद्द्यांनुसार, सरकारने आणीबाणीची परिस्थिती नीट हाताळण्यासाठी वापरकर्त्यांच्या फोनचे नियंत्रण राखून ठेवले आहे.

या ॲक्टमध्ये वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही नियम आणि अटी लागू करण्यात आल्या आहेत. येणाऱ्या काळामध्ये एखादी व्यक्ती आपल्या नावावर जास्तीत जास्त नऊ सीमकार्ड्स घेऊ शकते. या सोबतच जम्मू आणि काश्मीर तसेच ईशान्य भारतातील नागरिकांसाठी सीमकार्डची मर्यादा नऊपेक्षा कमी ठेवण्यात आलेली आहे. दरम्यान, एखाद्याने नऊपेक्षा जास्त सीमकार्ड्स खरेदी केली तर त्याला ५० हजार रुपयांपर्यंतचा दंड भरावा लागू शकतो.

दरम्यान, ऑटोमोबाइल क्षेत्रातही नवीन घडामोडी घडल्या आहेत. सध्या इलेक्ट्रॉनिक गाड्यांची चलती आहे. इलेक्ट्रिक गाड्यांच्या मागणीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशातच फ्रेंच कार निर्माता कंपनी 'सिट्रोन'ने आपली नवी इलेक्ट्रिक कार 'सी-३ एअरक्रॉस ईव्ही' युरोपियन मार्केटमध्ये लाँच केली आहे.

# अबब.....अंबा नदीने ओलांडली धोक्याची पातळी

वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरील वाहतूक ६ तास ठप्प , नवीन पूल बांधला तरी कसा आणि कशासाठी? स्थानिक, प्रवाशी वर्गातून संतप्त सवाल

पाली अंबा नदी पुलाजवळ दोन्ही बाजूला रस्त्यावर पाणी भरले

बलाप गावाजवळही रस्त्यावर पाणी

पाली/बेणसे दि.(धम्मशील सावंत) पाली सुधागड सह रायगड जिल्ह्याला सलग दोन दिवस पावसाने झोडपून काढले आहे.सर्वत्रच जनजीवन विस्कळीत झाले आहे. पावसामुळे रविवारी (ता.१४) अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली परिणामी वाकण पाली राज्य महामार्गावर पाली अंबा नदी पुलाजवळ दोन्ही बाजूला रस्त्यावर सखल भागात पाणी भरले होते. यामुळे सकाळपासून येथील दोन्ही बाजूची वाहतूक तब्बल ६ तास ठप्प होती. दोन्ही बाजूला वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. तसेच याच मार्गावर बलाप गावाजवळही रस्त्यावर पाणी साचल्याने तेथेही वाहतूक खोळंबली होती. दुपारी एक नंतर पाणी ओसरल्यावर वाहतूक सुरू झाली.

पालीवरून वाकणकडे व वाकण वरून पालीकडे येणारी वाहतूक बंद झाली होती. खाजगी वाहने एसटी बस ट्रक टेम्पो आदी मालवाहू वाहने अडकून पडली होती. रविवार असल्याने शाळा कॉलेज तसेच सरकारी कार्यालय यांना सुट्टी असल्यामुळे विद्यार्थी व चाकरमानी या कोंडीतून सुटले. मात्र इतर प्रवासी व स्थानिक नागरिकांचे हाल झाले. पाली-वाकण मार्गावरच बलाप गावाजवळ वळणावर मोठ्या प्रमाणात पाणी तुंबले होते. या पाण्यातून काही वाहने धोकादायकपणे जात होती. मात्र छोटी वाहने अडकून पडली होती. नवीन पूल बांधला तरी कसा आणि कशासाठी? असा सवाल जनतेतून उपस्थित होत आहे.



वाकण पाली खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. पाली व जांभूळपाडा अंबा नदी आणि भालगूल येथे मोठे पूल बांधण्यात आले. तसेच पाली अंबा नदीवरील एक पूल पूर्ण झाला आहे. तर दुसऱ्या पुलाचे काम सुरू आहे. रस्ता रुंदीकरण व पुलामुळे पावसाळ्यात हा मार्ग सोयीचा व सुखकारक होईल अशी अपेक्षा सर्वांना होती. मात्र पावसाळ्यामध्ये या सगळ्याचे बिंग फुटले आहे. पाली अंबा नदी पुलाच्या दोन्ही बाजूला रस्त्यावर पाणी साचून मोठ्या प्रमाणावरती वाहतूक कोंडी झाल्यामुळे प्रवासी नागरिक प्रचंड हैराण झाले आहेत. त्यांची गैरसोय होत आहे.

----------------

*पाली अंबा नदीवरील पूल बिनकामाचा अंबा नदीवर नुकताच उंच व रुंद असा मोठा पूल बांधण्यात आला आहे. आणि एका बाजूच्या मोठ्या पुलाचे बांधकाम सुरू आहे. या आधी आंबा नदीवरील जुना पूल हा रुंद व उंचीने छोटा होता. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात या पुलावरून पाणी जाऊन प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी व वाहतूक ठप्प होत होती. नवीन रुंद व उंच पूल बांधल्यामुळे आता ही समस्या संपुष्टात येऊन पावसाळ्यात वाहतूक सुरळीत राहील, अशी अपेक्षा सर्वसामान्य जनतेला व प्रवाशांना होती. मात्र घडले भलतेच, नवीन मोठा व रुंद पूल झाला मात्र त्याच्या दोन्ही बाजूचा रस्ता हा खाली असल्यामुळे आता पुलावरून पाणी न जाता या दोन्ही बाजूच्या रस्त्यावर पाणी साचत आहे. आणि परिणामी दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प होत आहे. एमएसआरडीसी प्रशासनाने या दोन्ही बाजूला मोरी टाकणे किंवा उंच रस्ता करणे गरजेचे होते. मात्र तसे न झाल्यामुळे हकनाक नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.*

**************

*खुश्कीचा मार्ग वाकण पाली खोपोली राज्य महामार्ग मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाला जोडतो. तसेच दक्षिण कोकणातून पुणे व मुंबईला मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गाने जाणारे प्रवाशी व वाहने याच मार्गावरून जातात. हा मार्ग सुस्थितीत असल्यामुळे अनेक प्रवासी व वाहने याचा वापर करतात. मात्र पाली अंबा नदी पूल झाला असूनही पुलाच्या दोन्ही सखल बाजूला पाणी साचल्यामुळे प्रवाशी व वाहने दोन्ही बाजूस अडकून पडली व त्यांची गैरसोय झाली. ङ्गङ्गचौकट ३ङ्गआजूबाजूच्या शेतात पाणी ङ्गअंबा नदी दुथडी भरून वाहत असल्यामुळे आजूबाजूच्या शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी गेले त्यामुळे भात शेतीचे नुकसान झाले.*

===============

*अंबा नदीवरील पूलाच्या दोन्ही बाजूकडील पाणी असताना नागरिकांनी खबरदारी म्हणून सदर पुलाचा वापर करू नये. येथील वाहतूक तूर्तास थांबवण्यात आलेली आहे. पाणी ओसरल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात येईल. या ठिकाणी पोलीस देखील तैनात ठेवण्यात आले आहेत. तसेच प्रशासनातर्फे नागरिकांना खबरदारीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ङ्गउत्तम कुंभार, तहसीलदार, पाली-सुधागड*

# वडवली, आतलें, शेवरे मार्गावर ४५ वर्षांनी धावली लालपरी

## तीनही गावातील ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण

मंडणगड प्रतिनिधी दि. १४- सार्वजनीक वाहतूकीचे दृष्टीने असलेल्या तालुक्यातील देव्हारे, वडवली, आतले, शेवरे मार्गे चींचघर हा रस्ता ४५ वर्षा पूर्वी होऊन देखील या रस्त्यावरून एस् टी गाडी धावत न्हवती वडवली, आतले, शेवरे ग्रामस्थ मंडळीनी या गावांतून मुंबई एस टी गाडी चालू करावी यासाठी क्रीत्येक वर्षे सतत मागणी करत होते या गावांतून गाडी नसल्याने मुंबईला जाणाऱ्या व मुंबईवरून येणाऱ्या चाकरमानी तसेच ग्रामस्थांची खूपच गैरसोय होत होती.

देव्हारे अथवा चिंचघर या गावातून खाजगी वाहने किंवा पाई प्रवास करुन या गावात जाणे शक्य होत होते. सर्वांना खासगी बसने प्रवास करत लागत असे ग्रामीण भागातील तालुक्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी तसेच आजारी वृध्द लोकांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी गैरसोय होत असे अखेर वडवली,

आतले, शेवरे या तीन गावातील ग्रामस्थानी एकजूट होऊन मंडणगड एस् टी आगार प्रमुख यांच्या कडे बोरिवली बोरथळ, बोरथळ देव्हारे, वडवली, आतले शेवरे मार्गे चालू करावी यासाठी निवेदन देण्यात आले होते. या गावांतील ग्रामस्थांची गैरसोय लक्षात घेवून मंडणगड एस् टी आगाराने तसेच दापोली मंडणगड तालुक्याचे आमदार योगेश दादा कदम यांच्या शिफारशीने तसेच शिवसेना

तालुका प्रमुख प्रताप घोसाळकर,यांच्या पाठ पुराव्याने व सिद्धेश देशपांडे यांच्या प्रयत्नाने अखेर १२जुलै २०२३ रोजी बोरथळ बोरिवली बोरिवली बोरथळ शेवरे आतले,वडवली देव्हारे मार्गे चालू करण्यात आली तिन्ही गावांतील ग्रामस्थानी एस.टी मोठ्या दणक्यात स्वागत केले तिन्ही गावांतील ग्रामस्थात उत्साह चे वातावरण पसरले आहे. आपल्या गावांत एस टी गाडी चालू झाल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या तर अनेकांच्या डोळ्यातून आनंदाचे अश्रू वाहू लागले कारण बरेच वर्षे या तीन गावांचे स्वप्न होते लाल परी आपल्या गावातून कधी धावेल अखेर तिन्ही गावांतील स्वप्न पूर्ण झाले.

लाल परी चे आगमन होताच तिन्ही गावांतील ग्रामस्थमंडळीनी गाडीचे जल्लोषाने स्वागत केले चींचघर ग्रामपंचायत सरपंच प्रतीक्षा लोंढे यांनी प्रथम एस टी गाडीची पूजा केली तिन्ही ग्रामस्थ मंडळीच्या वतीने वाहन चालक,शिवाजी गडदे, वाहक नाना आंबेकर यांचा शाल श्रीफळ देवून सन्मान करण्यात आला तिन्ही गावातील ग्रामस्थांच्या वतीने श्रीफळ फोडून एस टी गाडी सोडण्यात आली या प्रसंगी, चींचघर ग्रामपंचायत सरपंच प्रतीक्षा लोंढे, तसेच ग्रामस्थ बळीराम महाडिक, कृष्णा घागरूम ,सुनील गावडे संदीप महाडिक सतीश लोंढे, रमेश शिर्के ,दिनेश फराटे, रोहिणी शिर्के तसेच वडवली आतले गावातील अमृत मोडकले ,राजू मोडकले,प्रमोद म्हाबदी रमेश मोडकले, किशोर बंगाल, सखाराम म्हाबदी,संतोष मोडकले प्रकाश दोडकडे, तुषार करावडे , संगीत बने, स्वप्निल आग्रे ,तसेच वडवली, आतले शेवरे गावातील असंख्य ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या

# सर्वोच्च न्यायालयाच्या ईडीला कान पिचक्या; लहरीपणाने अटक करता येणार नाही

नवी दिल्ली : देशभरामध्ये ईडीची दहशत निर्माण झाली आहे. गैरव्यवहाराच्या संशयाने देखील ईडीकडून अटक करण्यात आली आहे. ईडीकडून हे अटक सत्र सुरु असल्याने त्यावरुन सुप्रीम कोर्टाने खडेबोल सुनावले आहे.अर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) कलम १९ अंतर्गत केवळ तपासाच्या उद्देशाने संशयिताला अटक करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.लहरीने कोणालाही अटक करू शकत नाही दिल्लीचे मुख्यमंत्री व आपचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना देखील दिल्लीच्या कथित मद्य घोटाळा प्रकरणातील संशयावरुन त्यांना अटक करण्यात आली होती. त्यांनी सुप्रीम कोर्टामध्ये धाव घेतल्यानंतर त्यांना अखेर जामीन देण्यात आला आहे. मात्र त्यांना संशयावरुन अटक केल्याने सर्वत्र




रोष व्यक्त केला जता आहे. अरविंद केजरीवाल यांच्या अंतरिम जामीन याचिकेवरील सुनावणीवेळी न्या. संजीव खन्ना आणि न्या. दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने ईडी अधिकारी स्वत:च्या मर्जीने आणि लहरीने कोणालाही अटक करू शकत नाही असे खडेबोल सुनावले आहेत.

कारण सिद्ध करणे ही अधिकाऱ्याची जबाबदारी ईडीकडून संशयाने देखील अटक करत असल्यामुळे द्विसदस्यीय खंडपीठाने स्पष्ट केले आहे. संशयित दोषी आहे असे, तपास अधिकाऱ्यांचे मत तयार झाल्यावरच त्याला अटक करण्याचा अधिकार वापरता येईल असे न्यायालयाने नमूद केले. असे मत तयार होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे ठोस पुरावे असले पाहिजेत आणि त्याने कारणांची लेखी नोंद केली पाहिजे अशी महत्त्वाची बाब सुप्रीम कोर्टाकडून मांडण्यात आली आहे. याबाबत मत मांडताना न्यायालयाने सांगितले की, संबंधित अधिकाऱ्याचा, अटक करण्यात आलेल्याचा दोष प्रस्थापित करणाऱ्या पुराव्यांच्या आधारे खरा विश्वास आणि तर्क ही कायदेशीर गरजसुद्धा आहे. तसेच अटक करण्याचे कारण सिद्ध करणे ही जबाबदारी अधिकाऱ्याची आहे, ही जबाबदारी अटक करण्यात आलेल्या संशयिताची नाही.असे स्पष्ट मत सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने मांडले आहे. पुढे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की,

अधिकाऱ्याला अटक करावयाच्या व्यक्तीला गोवणारा पुरावा वेचकपणे निवडण्याची परवानगी देता येणार नाही. पीएमएलएच्या कलम १९(१) अंतर्गत अटक करण्याचा अधिकार मनमर्जी आणि लहरीप्रमाणे करता वापरता येणार नाही. असे सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे ईडीच्या सततच्या अटकेला आणि तुरुंगवास झाल्यानंतर पुरावा अभावी सुटका करण्याच्या प्रक्रियेला सुप्रीम कोर्टाकडून लगाम घालण्यात आला आहे.

# पाच वर्षे काँग्रेसमध्ये फूट पडली नसली तरी विधान परिषदेत मते फुटली

मुंबई : गेल्या पाच वर्षात शिवसेना व राष्ट्रवादी विधिमंडळ पक्षात फूट पडली असली तरी नेहमी चर्चेत असलेल्या काँग्रेस विधिमंडळ पक्षात मोठी फूट पडलेली नाही. पण लागोपाठ दोन वर्षे विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसची मते फुटली आहेत. यंदा पुरेशी मते नसतानाही तिसरा उमेदवार उभा करण्याच्या महाविकास आघाडीच्या निर्णयाने काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.

विधानसभा निवडणूक पार पडली आणि महाविकास आघाडीचा प्रयोग करण्यात आला. उद्धव ठाकरे यांचे सरकार स्थापन झाल्यापासून हे सरकार पडणार अशी चर्चा सुरू झाली. काँग्रेसचे आमदार फुटणार अशी आवई तेव्हा उठली होती. करोनामुळे सारे व्यवहार ठप्प झाले आणि राजकीय आघाडीवर सामसूम होती. अशोक चव्हाण यांच्यापासून काँग्रेसच्या विविध नेत्यांची नावे फुटण्याच्या यादीत घेतली जात होती. मंत्रिपद न मिळालेले आमदार संपर्कात असल्याची कुजबूज भाजपच्या गोटातून केली जात होती. यातून काँग्रेसमध्ये संशयाचे वातावरण होते.दोन वर्षांपूर्वी याच काळात राज्यसभा आणि विधान परिषद



निवडणुकीत महाविकास आघाडीला फटका बसला होता. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंड केले. यापाठोपाठ अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीत फूट पडली. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षात फूट पडली. पण काँग्रेस विधिमंडळ पक्षात अशी मोठी फूट पडलेली नाही. अशोक चव्हाण यांनी पक्षांतर केले. अन्य काही आमदार सत्ताधारी पक्षाच्या संपर्कात आहेत. पण काँग्रेस विधिमंडळ पक्ष फुटीपासून वाचला होता.काँग्रेस विधिमंडळ पक्षात फूट पडलेली नसली तरी विधान परिषद निवडणुकीत काँग्रेस आमदारांची मते फुटली आहेत. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर २०२० मधील विधान परिषद निवडणूक बिनविरोध झाली होती. २०२२ मध्ये झालेल्या विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसची मते फुटली होती. तेव्हा काँग्रेसने चंद्रकांत हंडोरे आणि भाई जगताप या दोघांना उमेदवारी दिली होती.


हंडोरे यांना अधिकची मते तर भाई जगताप यांना अतिरिक्त मतांबरोबरच विजयाचे गणित जुळविण्यासाठी त्यांनी बाहेरून मते मिळवावीत, अशी व्यूहरचना होती. पण हंडोरे यांना दिलेली मतेच भाई जगताप यांच्याकडे गेली. परिणामी दुसऱ्या क्रमांकावरील जगताप निवडून आले तर हंडोरे पराभूत झाले.

यंदा काँग्रेसची सहा ते सात मते फुटल्याचा संशय आहे. पक्षाच्या उमेदवार प्रज्ञा सातव यांना ३० मतांचा कोटा देण्यात आला होता. पण त्यांना पहिल्या पसंतीची पाच मते कमी पडली. अशोक चव्हाण यांच्याबरोबर असलेले तीन ते चार आमदारांची मते काँग्रेसने गृहित धरली नव्हती. याशिवाय दोन नेत्यांच्या घरातील मतांबाबत काँग्रेस नेत्यांना संशय होता. चार ते पाच मतांबाबत आम्हाला खात्री नव्हती. पण दोन अतिरिक्त मते फुटली ही बाब काँग्रेसने गांभीर्याने घेतली आहे. फुटलेल्या आमदारांच्या विरोधात कारवाई केली जाईल, असा इशारा प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

## पाली माणगाव मार्गावर लव्हेलीवाडी येथील कुंडलिका नदीवरील पुलाला पडले भगदाड रस्ता खचला प्रवासी नागरिक पर्यटकांचा जीव टांगणीला


पाली/बेणसे
(धम्मशील सावंत)

पाली माणगाव मार्गावर रवाळजे जवळील लव्हेलीवाडी गावाजवळ असलेल्या कुंडलिका नदीवरील पुलाला



एका ठिकाणी भगदाड पडले आहे. तसेच येथील रस्ता देखील खचला आहे. त्यामुळे येथून जाणाऱ्या वाहनांना व प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. ङ्क

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे या पुलावरील एका बाजूची वाहतूक बंद करण्यात आली आहे. तसेच येथे माहिती फलक लावले आहेत. सध्या मुंबई गोवा महामार्गावर पुई येथील पुलाचे काम सुरू असल्यामुळे या मार्गे वाहतूक वळवण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावरून रहदारी वाढली असून पुलावरील एकाच बाजूने रस्ता सुरू असल्याने वाहनांना अडथळा निर्माण होतो. तसेच पावसाळी पर्यटनासाठी अनेक पर्यटक येथून प्रवास करतात त्यांना देखील अशावेळी अपघाताचा धोका संभवतो. ङ्क या पुलाचे रुंदीकरण करण्यात आलेले आहे. मात्र रुंदीकरण केल्यानंतर देखील अशाप्रकारे पुलाला भगदाड पडून रस्ता खचल्याने कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण केला जात आहे. ङ्क मागील काही दिवसांपासून ही स्थिती अशीच आहे. प्रवासी, पर्यटक व ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने याची लागलीच दखल घेऊन पुलाची दुरुस्ती करण्यात यावी व चांगल्या दर्जाचे काम केले जावे.असेङ्कआदेश दळवी, माजी उपसरपंच, पाटणूस ग्रुप ग्रामपंचायत यांनी सांगितले.



## आमदार आयात करणे थांबवा;नितीन गडकरी संघर्षातून कार्यकर्ते निर्माण करा

*पणजी : प्रत्येक विधानसभेवेळी आमदार आयात करणाऱ्या प्रदेश भाजपला आज केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी खडे बोल सुनावले. संघर्षातून निर्माण झालेला कार्यकर्ता निःस्वार्थीपणे पक्षाचे काम करू शकतो.पक्ष वाढवण्यासाठी आणि निवडणुकीत यश मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी मतदारांपर्यंत जायला हवे, त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा. भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे येथे सामान्य कार्यकर्ताही पंतप्रधान बनू शकतो आणि हीच भाजपची वेगळी ओळख आहे. ती कायम ठेवण्यासाठी कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी प्रयत्न करावेत, असे गडकरी म्हणाले. भाजपच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत मार्गदर्शक म्हणून ते आज बोलत होते.पाच वर्षांत राज्यात ५० हजार कोटींची० कामे राज्याचा विकास करण्यासाठी शक्य ते सारे प्रयत्न केले जातील. विकासाला चालना दिली जाईल, देश विकसित होत असताना गोवाही विकसित होत जाईल, तो मागे पडणार नाही. येत्या पाच वर्षात ५० हजार कोटी रुपयांची कामे राज्यात केली जातील, असे आश्वासन केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिले.*

## नवरात्रोत्सव मंडळ रांजणखारच्या वतीने एकविरा देवस्थान येथे स्वच्छता श्रमदान

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे:

अलिबाग तालुक्यातील रांजणखार येथील नवरात्र उत्सव मंडळ यांच्यावतीने कार्ले -एकविरा देवस्थान परिसरामध्ये स्वच्छता श्रमदान करून देवस्थान परिसर स्वच्छ करण्यात आला.ङ्क नवरात्र उत्सव मंडळ रांजणखार यांच्या वतीने दरवर्षी विविध समाजप्रयोगी उपक्रम राबविले जातात.




त्यामध्ये स्वच्छता अभियान, ग्राम स्वच्छता, मंदिर परिसर स्वच्छता, पाणपोई सुविधा,मंदिर शेड,तसेच विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबवले जातात. याचाच एक भाग म्हणून या मंडळाच्या वतीने शुक्रवार दिनांक १२ जुलै रोजी एकविरा येथील देवस्थान परिसरातील मंदिर परिसर ते पाच पायरी पर्यंत परिसर आणि पायऱ्या पर्यंत स्वच्छता अभियान राबविण्यात आले .ङ्क या श्रमदानामध्ये मंडळाचे २० सदस्य सहभागी झाले होते. मंडळाचे राजेंद्र पाटील यांच्या वतीने हे श्रमदानाचे आयोजन करण्यात आले होते .या श्रमदान योजनेमध्ये दिलीप पाटील,गंगाधर म्हात्रे, समीर पाटील, जितेंद्र पाटील, मनोज पाटील, परेश पाटील, सदन चिकोरी, अखिलेश यादव, नंदकुमार म्हात्रे, संदीप ठाकूर, भाई पाटील व इतर सदस्यांनी सहभाग घेतला होता.ङ्क या संपूर्ण श्रमदानाचे सूसूत्र नियोजन पाटील टेंडर्स रांजणखार यांच्याकडून करण्यात आले होते.

मंडळाचे सदस्य श्रमदान करीत असताना अनेक भाविकांनी त्यांच्या उत्स्फूर्त कार्याचे कौतुक केले. तसेच या मंडळाच्या सदस्यांचा आदर्श सर्व भाविकांनी घेऊन अशा स्वच्छता मोहिमा वारंवार झाल्या तर येथे स्वच्छता राहून दुर्गंधी मुक्त परिसर राहील असेही त्यांनी सुचविले. या मंडळाच्या सदस्यांनी दिवसभर श्रमदान करून संपूर्ण एकविरा मंदिर परिसर स्वच्छ करण्यात आला.

## कोलमडते?

गेल्या पन्नास वर्षांत बहुतेक काळ देशात सर्वात श्रीमंत असलेल्या मुंबई महापालिकेवर अगोदर काँग्रेस आणि नंतर अविभाजित शिवसेना-भाजपाची सत्ता होती. याच काळात राज्यात सुरुवातीला काँग्रेस नंतर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस (आघाडी) अविभाजित शिवसेना काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (महाविकास आघाडी), आता एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाची (महायुती) सत्ता आहे. गेल्या पाच दशकांत महापालिका व राज्यात सत्तांतराचे अनेक खेळही झाले. डझनभर महापौर आले व गेले, तेवढेच मुख्यमंत्री सत्तेवर आले. कारभारी बदलले व नवीन आले पण देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई महानगराची काळजी सत्ताधाऱ्यांनी पुरेशी घेतली नाही हे खेदाने म्हणावे लागेल. राजकारण व सत्ताकारण चालूच राहणार. सत्ताधारी व विरोधी पक्ष बदलत राहणार पण मुंबई महानगराच्या समस्यांकडे पुरेसे लक्ष दिले जाणार नसेल, तर राज्यालाच नव्हे तर त्याची किमत देशाला मोजावी लागेल

मुंबई महानगराची लोकसंख्या दीड कोटींच्या घरात आहे. सर्व देशांतून रोजगारासाठी आलेले लोक या महानगरात राहत आहेत. मध्य, पश्चिम व हार्बर मार्गावरील खचाखच भरलेल्या लोकल्स ट्रेन्च्या गर्दीतून जीव मुठीत धरून मुंबईकर रोज प्रवास करीत असतात. पंचाहत्तर लाख मुंबईकरांची रोजी-रोटी, मुंबईची जीवनवाहिनी ओळखल्या जाणाऱ्या उपनगरी रेल्वे सेवेवर अवलंबून आहे. ही उपनगरी रेल्वे सेवा खंडित झाली, तर मुंबईत किती हाहाकार उडतो, याची प्रचिती पुन्हा एकदा गेल्या सोमवारी ८ जुलै रोजी आली. रात्री ६ तास कोसळलेल्या मुसळधार पावसाने मुंबई बंद केली. केवळ तीनशे मिमी झालेल्या पावसाने मुंबईची लोकल सेवा ठप्प झाली. रेल्वे मार्गावर व सर्व प्रमुख रस्त्यांवर तसेच लहान-सहान गल्ल्यांमध्ये नि अरुंद रस्त्यांवर पाणीच पाणी साचले. सहा तासांच्या पावसाने मुंबईची तुंबई झाली आणि देशाच्या आर्थिक राजधानीतील दैनंदिन जीवनाची चक्रे बंद पडली.

या देशात मुंबई हे एकच महानगर असे आहे की, ते चोवीस तास चालू असते. रेल्वे रात्री एक-दीडपर्यंत, तर बस, रिक्षा, टॅक्सी आदी वाहने रात्री उशिरापर्यंत कुठेही उपलब्ध असतात. मुंबई हे जसे श्रीमंत व गर्भश्रीमंतांचे शहर आहे, बॉलिवुडचे ग्लॅमर या शहराला आहे तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेचे चलनवलन याच महानगरातून होत असते. देशाला सर्वाधिक महसूल याच मुंबई महानगरातून दिला जातो. मग तीनशे मिमी. पावसाने मुंबईची चाके बंद कशी पडू शकतात? त्याला जबाबदार कोण? एक दिवस मुंबई बंद म्हणजे हजार-दीड हजार कोटींचे नुकसान होते, मग दरवर्षी पावसाळ्यात मुंबईत एकदा-दोनदा ठप्प होते, जनजीवन पूर्ण विस्कळीत होते, उपनगरी रेल्वेसेवा मान टाकते, या मुंबईकरांच्या वेदना कधी थांबणार? दरवर्षी पावसाळ्यात मुसळधार पावसाने मुंबईत अनेक रस्त्यांवर व सब-वेमध्ये पाणी तुंबते. वाहतूक बंद होते, ८ जुलैला तर अनेक रस्त्यांवर अंधेरी, मरोळ, कुर्ला, घाटकोपर, भांडुप, कांजूरमार्ग तसेच लालबाग, परळ, शीव, माटुंगा अशी डझनावरी ठिकाणे तीन ते चार फूट पाण्याखाली होती. मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये घराघरांत पाणी शिरले होते. जिथे मेट्रोची, पुलांची व रस्त्यांची कामे चालू आहेत, जिथे निळे पत्रे लावून मोठं मोठे उत्तुंग टॉवर्स उभारण्याचे काम चालू आहे, तिथे रस्त्यावर मुसळधार पावसाने तलाव निर्माण झाले होते. पाण्याचा निचरा होण्यास मार्ग नसेल, तर पाणी वाहून जाणार तरी कुठे?

महापालिका व राज्य सरकारमधील कारभारी बदलले तरी कर्मचारी, अधिकारी तेच असतात. दरवर्षी पावसाळ्यात पाणी का तुंबते, मुंबईची तुंबई का होते, याचे कारण त्यांना पक्के ठाऊक असते. यावर्षी मुंबईत नालेसफाई ११० टक्के झाल्याचा दावा करण्यात आला होता. स्वत: मुख्यमंत्री व सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी नालेसफाईची प्रत्यक्ष पाहणी केली होती. मग एका पावसातच मुंबई का पाण्याने वेढली गेली? सोमवारी विधिमंडळाचे अधिवेशन होते. बाहेरगावाहून येणारे काही मंत्री व आमदारही रेल्वे गाडीत अडकले होते, कोणी रेल्वेतून खाली उतरून रेल्वे मार्गावरून चालत होते, तर कोणी रेल्वेच्या दरवाजात उभे राहून गाडी कधी सुरू होणार याची वाट बघत होते. आमदार व मंत्री अडकले म्हणून त्यांना टीव्हीची प्रसिद्धी मिळाली, पण लक्षावधी मुंबईकर दरवर्षी पावसाळ्यात या यातना भोगतात, त्यावर विधिमंडळात कधी चर्चा होत नाही. महापालिका, रेल्वे, बेस्ट प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना तसेच मुंबई पोलिसांना पावसाळ्यापूर्वी एकत्रित चर्चेला बोलावून मुंबईची तुंबई होऊ नये म्हणून काय काय उपाययोजना केली आहे व करायला हवी, यावर दरवर्षी चर्चा होत नाही. राज्य सरकार व महापालिका, रेल्वे, बेस्ट, मुंबई पोलीस यांच्यात समन्वय असणे सर्वात महत्त्वाचे आहे.

बॅ. ए. आर. अंतुले मुख्यमंत्री असताना त्यांच्या पत्नी नर्गिस या पुण्याला जाताना खंडाळा घाटात वाहतूक कोंडीत अडकल्या होत्या. त्याच सुमारास तत्कालीन ऊर्जामंत्री जयंतराव टिळक हे पुण्याहून मुंबईला येताना खंडाळा घाटात अनेक तास अडकले होते. स्वत: अंतुले यांनी खंडाळा घाटातील वाहतूक कोंडीची दखल घेतली व तातडीने घाटात पर्यायी मार्ग उभारण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी पावसाळ्यात मुंबईची तुंबई होते व आर्थिक राजधानीचे जनजीवन ठप्प होते, हा मोठा अपराध आहे असे कुणाला वाटत नाही का? मुंबईचे जनजीवन एक मिनीटही खंडित होता कामा नये, यासाठी राज्यकर्ते ठोस उपाय का शोधत नाहीत? मुसळधार पाऊस असताना समुद्राला भरती सुरू झाली की, मुंबईत पाणी तुंबते, हेच कारण वर्षानुवर्षे ऐकायला मिळत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात यापुढेही दरवर्षी पावसाळ्यात मुंबई तुंबतच राहणार का? दिल्ली, चेन्नई, पाटणा, गुवाहटी अगदी युरोप, अमेरिकेतील शहरांनाही अतिवृष्टीचा फटका बसल्यावर तेथील जनजीवन विस्कळीत होते, पण दरवर्षी नित्यनियमाने पावसाळ्यात ही शहरे नेहमी हमखास पाण्याखाली असतात असे दृश्य दिसत नाही. समुद्राकाठी शहर आहे

## ७ राज्यातील १३ जागांच्या पोटनिवडणूकीचे निकाल आले समोर

नवी दिल्ली-लाईव्ह ट्रेंड्स न्यूज वृत्तसेवा लोकसभा निवडणुकीनंतर आज विधानसभा पोट निवडणुकांच्या निकालाकडे सगळ्यांचे लक्ष होते. सात राज्यातील १३ विधानसभा क्षेत्रात पोटनिवडणूक झाली. या १३ जागांवर १० जुलैला मतदान झाले होते.बिहार, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तराखंड, पंजाब आणि हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये विधानसभेची पोटनिवडणूक झाली. हिमाचल प्रदेशच्या नालागढ सीट वर सर्वाधिक ७८.१ टक्के आणि उत्तराखंडच्या बद्रीनाथ सीटवर सर्वात कमी ४७.६८ टक्के मतदान झाले होते.१३ विधानसभा क्षेत्रात झालेल्या या पोटनिवडणुकीत काँग्रेस प्रणीत इंडिया आघाडीने दमदार प्रदर्शन केलय. इंडिया आघाडीने ११ जागांवर विजय मिळवला. भाजपाला हिमाचल प्रदेशमधील हमीरपूर आणि मध्य प्रदेशच्या अमरवाडा जागेवर समाधान मानाव लागले. हिमाचल प्रदेशात तीन पैकी दोन जागा काँग्रेसने तर एक सीट भाजपाच्या खात्यात गेली. काँग्रेसने देहरा आणि नालागढ सीटवर विजय मिळवला. देहरा येथून सीएम सुक्खू यांच्या पत्नी कमलेश ठाकूर जिंकल्या. नालागढ मधून हरदीप सिंह बावाने भाजपाच्या केएल ठाकूर यांना ८९९० मतांनी हरवले. हमीरपूर येथून भाजपाचे आशीष वर्मा जिंकले.पश्चिम बंगालमध्ये चारही जागा ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने जिंकल्या. हिमाचल प्रदेशात तीन पैकी दोन जागा काँग्रेसने आणि एक सीट भाजपाने जिंकली. पंजाबच्या जालंधरमधून आम आदमी पार्टीने बाजी मारली. उत्तराखंडच्या दोन्ही जागा काँग्रेसने जिंकल्या. तामिळनाडू विक्राक्वंडीची सीट डीएमकेने जिंकली. मध्य प्रदेश अमरवाडाची सीट भाजपाने जिंकली. बिहार रुपौली सीट अपक्ष उमेदवार शंकर सिंह यांनी जिंकली.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
सोमवार, १५ जुलै २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## गायक जगन्नाथ खरगावकर यांचा सुमधुर आवाज घुमतोय कोकणच्या मातीत.

तळा कृष्णा भोसले.



रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील कुडगाव येथील गुरुवर्य शंभूराजे घराण्यातील रमेश खरगावकर यांचेङ्गशिष्य गायक जगन्नाथ गोविंद खरगावकर हेओमसाई नृत्य कलापथकाच्या माध्यमातून वेगवेगळ्या शाखामधुन कलगी तुरा नाचमंडळामार्फत आपली गायण कला प्रदर्शित करीत कोकणच्या मातीतीलङ्गसुमधुर आवाज साऱ्या श्रोत्यांना मंत्र मुग्ध करीत आहे. कुडगाव येथे जन्मलेल्या एका लहानशा खेड्यात हा गायक लहानपणापासून हा धंद जोपासत आहे. १९८५ पासून त्यांनी आपल्या गावातल्या तरुण मंडळी ना एकत्रङ्गकरीत विष्णू प्रासादिक भजन मंडळाच्या माध्यमातून सुध्दाङ्गअतिशय सुंदर भावगीते मराठी माणसाच्या मनाला स्पर्श करून शब्द आसमंतात दुमदुमवित आहेत. असा त्यांचा भजनी प्रवास लोकप्रिय आहे. गुरूवर्य रमेश बुवा खरगावकर व कृष्णा बुवा खरगावकर यांचे कृपाशीर्वादाने त्यांची भजने अफाट गाजतङ्गआहेत. भगवंताचे नाम मुखाने गात अनेकांना त्याची गोडीङ्गलावत भजन मालिका ते सातत्याने संभाळत रायगड भुषणङ्गया पुरस्काराचे ही मानकरी ठरणार आहेत. अशा या गायकाच्या कलेला जनता जनार्दन सुद्धा मोठ्या प्रमाणात दाद देत आहेत. सध्या आता त्यांच्या कलगीतुरा उन्नती मंडळाच्या तुरेवाले नाचमंडळ कुडगाव, त्याचबरोबर गणेश नृत्य कला वैभव खारगाव या नाचाचे सामने रंगू लागले आहेत. नुकताच १२ जुलै २०२४ रोजी शाहीरा ज्योती शिंदे शक्ती वाले याचें समवेत शिवाजी नाट्य मंदिर दादर येथे बारीङ्गपार पडली. यामध्ये मुंबई करांनी भरभरून साद दिली आहे. अशा या उमदया कलावंतांना रसीकाने साद दिली तर हेच या रायगडच्या मातीतील हिरे अधिक अधिक लोकप्रिय होतील यात शंका नाही.

## आनंददायी शनिवार ......

परशुराम एज्युकेशन सोसायटी संचालित प्राथमिक शाळा पोफळी येथे शनिवार दिनांक १३ जुलै २०२४ रोजी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.महेंद्र कापडी सर यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय परिसरातील वनस्पतींची ओळख करून देण्यात आली. यामध्ये रानभाज्या औषधी वनस्पती यांची ही माहिती सांगण्यात आली. विद्यार्थ्यांना



निसर्गाची प्रत्यक्ष अनुभूती देण्यात आली. हलक्याशा पावसाच्या सरीमध्ये सर्व विद्यार्थी शिक्षकांबरोबर रांगेत शालेय परिसरातून फिरून आले यादरम्यान विद्यार्थ्यांना नदी,डोंगर, वेली,झाडे यांचे मनमोहक दृश्य पाहायला मिळाले. हिरवागार शालू पांघरलेला निसर्ग विद्यार्थ्यांना पाहायला मिळाला. मुख्याध्यापक श्री.महेंद्र कापडी सर यांनी शालेय परिसरातील तुळस, टाकळा,अळू इत्यादी वनस्पतींची माहिती विद्यार्थ्यांना दिली त्यांचे औषधी गुणधर्म सुद्धा समजावून सांगितले वनस्पतींचे महत्त्व काय आहे याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. ज्येष्ठ शिक्षिका सौ .शिवानी शिंदे,सौ.प्रतिभा धुमाळ,श्री.अशोक मिसाळ,सौ.साधना गायकवाड,सौ. मनीषा नाईक यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना विविध वनस्पतींची माहिती व महत्त्व समजावून सांगितले.

## शरदचंद्रजी पवार कृषी महाविद्यालय येथे पारंपरिक व आधुनिक पद्धतीने भात लागवड..!

आबलोली (संदेश कदम)

भात हे कोंकणातील प्रमुख पीक! याबाबत अधिकाधिक प्रात्यक्षिकद्वारे अनुभवात्मक माहिती विद्यार्थ्यांना मिळावी तसेच या उपक्रमअंतर्गत कोंकण कृषी विद्यापीठामार्फत नवनवीन भात पिकांच्या जाती व विविध लागवड पद्धती विकसित करण्यात आल्या,त्यादेखील विद्यार्थ्यांना माहीत व्हाव्यात या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.चिपळूण तालुक्यातील शरदचंद्रजी पवार कृषी महाविद्यालय खरवते दहिवली येथे द्वितीय व तृतीय वर्ष कृषी विद्यार्थ्यांकडून पारंपरिक व आधुनिक पद्धतीने भात लागवड प्रशिक्षण यानिमित्ताने घेण्यात आले.महाविद्यालयाच्या विस्तीर्ण प्रक्षेत्रावर हे प्रशिक्षण घेण्यात आले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनितकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.यासाठी कृषी विद्या विभाग प्रा.ठाकरे यु.इ.,प्रक्षेत्र प्रमुख प्रा.साळवी व्ही.एम.,प्रा.सावंत व्ही.जे.,प्रा.पाकळे एन.सी.,प्रक्षेत्र व्यवस्थापक श्री.कोळपे राजेंद्र,श्री.सुर्वे आकाश,श्री.साळवी रितेश आणि इतर प्रक्षेत्र कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.याउपक्रमासाठी द्वितीय व तृतीय वर्ष कृषी चे विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने सहभागी झाले होते.



## निधन वार्ता माजी गटविकास अधिकारी शशिकांत गुजर यांचे हृद्यविकाराचे धक्याने अकाली निधन

मंडणगड प्रतिनिधी

मंडणगड पंचायत समितीचे माजी गटविकास अधिकारी शशिकांत भैरवराव गुजर वय (७४) यांचे रविवार १४ जुलै २०२४ रोजी तालुक्यात जांभुळनगर या त्यांचे गावातील निवासस्थानी हृद्यविकाराचे धक्याने



अकाली निधन झाले त्यांच्या अकाली जाण्याने तालुक्यातील शोक व्यक्त केला जात आहे. त्यांचे पार्थिवार जांभुळनगर येथील स्मशानभुमीत तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. शासकीय सेवेतील आपल्या कार्यकाळात त्यांनी एक कर्तव्यदक्ष लोकाभिमुख समाजप्रीय शासकीय अधिकारी म्हणून लौकीक मिळवीला होता. मंडणगड तालुक्यात शैक्षणीक, सामाजीक, राजकीय, सांस्कृतीक क्षेत्रात त्यांनी विशेष काम केले असून रयत शिक्षण संस्थेच्या पालवणी शाळेच्या प्रगतीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. जांभुळनगर येथे नुकत्याच उभ्या करण्यात आलेल्या शिवस्मारक समितीचे सल्लागार म्हणूनही ते काम पहात होते. याशिवाय निवृत्तीनंतर गावातील आपल्या शेतीत ते तालुक्यातील शेतकऱ्यांना पथदर्शी ठरतील असे शेतीचे नवनवीन प्रयोग करुन निवृत्तीनंतरचे आयुष्य जगत होते त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा एक मुलगी असा परिवार आहे.

## अंबा नदीने ओलांडली धोक्याची पातळी! महसूल व पोलीस खात्याकडून सतर्कतेचा इशारा

नागोठणे -: नारायण म्हात्रे

सतत पडणाऱ्या पावसामुळे नागोठण्याच्या अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून पुराचे पाणी नागोठण्याच्या ऐतिहासिक पुलावरून वाहत असून नागोठणे-वरवठणे गावाचा संपर्क तुटला आहे. अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्यामुळे पुराचे पाणी छ. शिवाजी महाराज चौक, एसटी बस स्थानक, वन अधिकारी कार्यालय, मुख्य बाजारपेठ, नुक्कड गल्ली, मच्छीमार्केट या ठिकाणी घुसले असून नागोठणे बाजारपेठेतील व्यापा-यांची त्रेधातिरपिट उडालेली आहे, तसेच




नदीकाठच्या रहीवाशांमध्ये भितीचे वातावरण पसरले असून प्रशासन तसेच नागोठणे पोलिसाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला असून नागोठणे पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर, पोलिस हवालदार विनोद पाटील यांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवला असून महसूल खात्याचे मंडळ अधिकारी भरत गुंड हे आपले सहकारी पाटणसई सजाचे तळाठी सचिन सांबरी व अन्य सहकाऱ्यांसह नागोठणे कार्यालयात तळ ठोकून परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. तसेच स्पिकरच्या माध्यमातून दवंडी पिटवून जागृकतेचा वेळोवेळी इशारा देण्यात आला. जुलैचा जवळजवळ पंधरवडा उलटला असताना मुंबई, पुण्यासह राज्यात पावसाने जोरदार फलंदाजी करत दमदार हजेरी लावली आहे यामुळे शाळा, कॉलेज यांना सुट्टी जाहीर केली आहे अनेक ठिकाणी बाजारपेठेत पुराचे पाणी शिरले असून पुराच्या पाण्याने छोट्या मोठ्या व्यावसायिकांचे बरेच नुकसान झाले आहे तसेच ऐन भरात लागवड आली असताना भाताची रोपे वाहून व कुजून गेल्याने शेतकरी राजा चिंतेत पडला आहे. नागोठणे येथे आज रविवारी होणारा आठवडा बाजार पुराचे पाणी घूसल्याने होऊ शकला नाही त्यामुळे अनेक छोटे मोठे धंदेवाल्यांच्या व ग्राहकांच्या चेह-यावर नाराजी दिसून आली. अशातच पावसाने उघडीप दिल्याने पुराचे पाणी ओसरण्यास सुरूवात झाली.

## सर्पमित्र किशोर शिर्के यांचे समाजात खूप मोठे योगदान

नागोठणे -: नारायण म्हात्रे

नागोठणे विभागातील कडसुरे सारख्या खेडे गावात जन्माला आलेले किशोर शिर्के हे लहानपणापासून ध्येयवादी व सामाजिक कार्याची भलतीच आवड असणारे, शालेय जीवनात त्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून बरीचशी जनजागृती करून समाजाला नेहमीच जागृत ठेवण्याचे कार्य केले तसेच त्यांनी याचवेळी दादा कोंडके यांची हुबेहूब भूमिका



साकारून त्यांना या प्रत्येक कार्यक्रमात त्यांची बहीण माया शिर्के (उज्वला ठाकूर- महीला रायगड पोलिस) यांनी मोलाची साथ देवून रसिक जनांची वाहव्वा मिळविली.

त्यांच्या या शालेय कार्यक्रमामुळे मिनी दादा कोंडके ही त्यांना उपाधी सुध्दा मिळाली पण किशोर या नावात मला वाटतं जादूच आहे कारण या नावाची व्यक्ती ही समाजासाठी काहीतरी करीत असते. असेच किशोर शिर्के हे

नागोठणे येथील रिलायन्स कंपनीत पर्यावरण खात्यात सेवा करत असून त्यांना रिलायन्सकडून पर्यावरण व मानवी जीवांचे बचाव करण्याचे धडे दिले जातात व इथूनच त्यांनी हे धडे गिरवले आहेत. आतापर्यंत त्यांनी हजारो साप पकडून जंगलात सोडले आहेत व त्यांना जीवदान देण्याचे काम केलेले आहे.

नाग, साप, कांडर, मण्यार हे अतिविशारी जनावर एका स्टीकच्या आधारावर कधीकधी जीव धोक्यात घालून पकडावे लागतात असेही ते म्हणाले पण हे ईश्वरी कार्य असून भयमुक्त स्वरूपात हे कार्य करावे लागते असे त्यांनी आमच्या सूर्योदयच्या प्रतिनिधीशी प्रतिक्रिया व्यक्त केली. अशा या समाजातील परोपकारी व्यक्ती प्रसिद्धीपासून दूर असून शासन स्तरावर यांचा यथोचित गौरव होवून जिल्ह्यातील मानाचा रायगड भूषण पुरस्कार मिळावा ही जनतेतून मागणी होत आहे.

पुणे विभागीय कार्यालय पत्ता : बालाजी नगर कळ्ळउ बँक शेजारी कुडाळकर क्लास पहिला मजला पुणे जिल्हा कार्यालय दैनिक सूर्योदय – अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती), संपर्क : ९६२३२३०४२६

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )